ज्ञान प्रबोधिनी संस्कार माला

# वटसावित्रीची पूजा

मूल्य : ८ रुपये
आवृत्ती पहिली

प्रकाशन दिन - राष्ट्रीय सौर २९ आषाढ १९२४
२० जुलै २००२ (आषाढी एकादशी)

# संस्कारांमागची मूळ भूमिका

चित्रकर्म यथाऽनेकैः रङ्.गैः उन्मील्यते शनैः ।
[1]मानव्यमपि तद्वत् स्यात् संस्कारैः विधिपूर्वकैः ॥
-पाराशरगृह्यसूत्र हरिहरभाष्य

कुंचला धरोनि । चित्र जे काढिले ।
रंग ते भरिले । जैसे छान ॥
मानवी जीवना । येण्यास आकार ।
विविध संस्कार । आवश्यक ॥

वेगवेगळ्या रंगांच्या योगाने हळुहळू चित्र जसे आकारास येत जाते, त्याप्रमाणे माणूसपण हेही पद्धतशीरपणाने केलेल्या संस्कारांमुळे क्रमाक्रमाने उमलत जाते.


एखादे चित्र हे साधे रेखाचित्र असण्यापेक्षा त्यात जेव्हा वेगवेगळे रंग वापरले जातात, त्यावेळी ते निश्चितच अधिक खुलून दिसते. माणसाचे आयुष्य म्हणजे सुद्धा एक चित्र-पटच आहे. जीवन हे सरळ साधे रेखाचित्राप्रमाणेही जगता येते. परन्तु त्यात जर संस्काररूपी रंग भरले, तर जीवनातील शोभा नक्कीच वाढते. जीवन अधिक उदात्त, उन्नत, उत्तम बनू शकते. चित्रात रंग भरताना रंगसंगती अनुकूल साधणे महत्त्वाचे असते. तसे हे संस्कारही योग्य रीतीने केले जाणे आवश्यक आहे. यामध्ये संस्कारामागचा अर्थ समजावून घेतला जाणे सगळ्यात महत्त्वाचे आहे.

म्हणूनच ज्ञान प्रबोधिनीने अशा प्रत्येक संस्काराच्या सार्थ पोथ्या तयार केल्या आहेत. ज्यायोगे, केल्या जाणाऱ्या संस्कारामागचा मूळ अर्थ, मूळ उद्देश सर्वसामान्यांच्याही ध्यानात येईल.

१ ब्राह्मण्यमपि

पर्यावरण परिरक्षणासाठी

# वटसावित्रीची पूजा



ज्ञान प्रबोधिनी

## संस्कृत संस्कृति संशोधिका

५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३०
दूरभाष - ४४७८०९५, ४४७७६९१

# प्रस्तावना

परंपरेने चालत आलेल्या वटसावित्रीच्या पूजेत पाटावर वटवृक्ष, सावित्री, सत्यवान यांचे चित्र काढून त्याची यथासांग पूजा करण्यास सांगितले आहे. वटपौर्णिमेच्या दिवशी वडाच्या झाडाचीच पूजा करणे हे उत्तम! थोडे दूर जावे लागले तरी प्रत्यक्ष वटवृक्षाची हवा घ्यावी. वडाच्या फांद्या तोडून त्या फांदीची पूजा करण्याची पद्धत कधी, कोणी सुरू केली ते माहीत नाही. पण आज अनेक शिक्षित महिलाही या पद्धतीने वडाच्या फांदीची पूजा करताना दिसतात. याचे कारण धर्माचे रहस्य हरवले आहे. सावित्री ही रत्नपारखी आहे. तिने आंतरिक गुणांची पारख करून निवडलेल्या वरास आईबाप अन् देवगुरू यांच्या सूचनांकडे लक्ष न देता माळ घातली. या तिच्या कृतीतून केवढा आत्मविश्वास व्यक्त होतो! पतीचे प्राण वाचवण्याचे अवघड काम ती आपल्या पर्यावरणाच्या ज्ञानाने, चिकाटीने आणि दुर्दम्य इच्छाशक्तीने करून दाखवते याचे विस्मरण होऊन षोडषोपचार पूजा यथासांग केली तरी त्या पूजेने काय साधेल? खरी पूजा म्हणजे काय ते आपण समजावून घेतले पाहिजे.

**पूजा म्हणजे काय?** - 'पूजा' हा शब्द वेदात नाही. तो शब्द तामिळ असावा. 'पू' म्हणजे फूल व 'जा' हा प्रत्यय 'कृती' अशा अर्थाचा आहे. 'फुलाने करावयाची कृती म्हणजे पूजा.' ज्यांच्याबद्दल प्रेम, आदर, कृतज्ञता या भावना व्यक्त कराव्याशा वाटतात त्या फुलाच्या समर्पणाने व्यक्त करणे म्हणजे पूजा करणे.

ऋषींनी आपल्याला आज्ञा दिली आहे. 'मातृदेवो भव।' आईला देव मानणारे असे व्हा. 'पितृदेवो भव।' वडिलांना देव मानणारे असे व्हा. 'आचार्यदेवो भव।' गुरुला देव मानणारे असे व्हा. 'राष्ट्रदेवो भव ।' राष्ट्राला देव मानणारे असे व्हा.

म्हणजेच या सर्वांची आदराने पूजा करा. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वागा.

फक्त माणसांचीच नाही तर पशुपक्ष्यांचीही आपल्याकडे पूजा केली जाते. तसेच निर्जीव वस्तूंचीदेखील आपण पूजा करतो. आपली रोजच्या वापरातील वाहने, यंत्रे या सर्वांची पूजा करतो. आपल्याला सेवा देणाऱ्या सर्व वस्तूंची, व्यक्तींची आपण काळजी घेणे, त्यांची स्वच्छता, शोभा, उपयुक्तता टिकेल, वाढेल अशी कृती करणे हाच पूजेचा खरा अर्थ आहे.

याबरोबरच 'वृक्षदेवो भव' असेही म्हणता येईल. म्हणजेच वृक्षाला देव मानणारे असे व्हा. जो आपल्या दिव्य गुणांचे व सामर्थ्याचे दान करतो तो देव. वृक्ष हे खरोखरीच सत्पुरुष वा देव आहेत असे एका सुभाषितात म्हटले आहे.

**छायामन्यस्य कुर्वन्ति तिष्ठन्ति स्वयमातपे ।**
**फलान्यपि परार्थाय वृक्षाः सत्पुरुषा इव ।।**

जे स्वतः उन्हात उभे राहून दुसऱ्यांना सावली देतात. ज्यांची फळेदेखील दुसऱ्यांकरिता असतात असे वृक्ष म्हणजे सत्पुरुषाप्रमाणेच आहेत. वृक्षाचा हा दातृत्वाचा गुण आपण घेतला पाहिजे. तो आपल्या आयुष्यात उतरवला पाहिजे. म्हणूनच याच भावनेने आपण वडाची पूजा करावी. वडाला पाणी घालणे, प्रसंगी पार बांधून त्याचे रक्षण करणे, पोषण करणे म्हणजेच पूजा.

प्रतिवर्षी देशभर सर्व भगिनींनी एकेक वडाचं रोप लावून ते वाढवत राहण्याचे संकल्प केले तर हा देश संपन्न देश होईल यात संदेह नाही.

राष्ट्रीय सौर २९ आषाढ १९२४
२० जुलै २००२ (आषाढी एकादशी)

**य. शं. लेले.**
संस्कृत संस्कृति संशोधिका

---

**पूजेसाठी लागणारे साहित्य** - स्वच्छ पाण्याने भरलेला स्वच्छ तांब्या, भांडे, फुले, घंटा, ताम्हन सुपारी किंवा गणेशप्रतिमा, वडास तीन वेढे बसतील एवढे सूत किंवा दोरा, गंध, अक्षता, हळद कुंकू, उदबत्ती, नीरांजन, गुळखोबरे, बसण्यासाठी आसने (गुरुजी व पूजिका यांचेसाठी)

# वटसावित्रीची पूजा

अध्वर्यू : आज ज्येष्ठ पौर्णिमा आहे. पतिव्रता सावित्रीने याच दिवशी आपला पती सत्यवान याची यमराजाच्या हातून सुटका करून त्याचे प्राण परत मिळविले. हा प्रसंग वटवृक्षाखाली घडला. म्हणून हे व्रत वटसावित्री या नावाने ओळखले जाते.

अखंड सौभाग्य मिळावे यासाठी भारतीय स्त्रिया या दिवशी वडाची पूजा करून सावित्रीची प्रार्थना करतात.

पूजेच्या आधी पूजकांची आणि पूजेच्या जागेची शुद्धता करावयाची असा संकेत आहे. त्यानुसार आजच्या उपासनेचा प्रारंभ स्वत:ला विशुद्ध करण्यापासून करू.

**अध्वर्यू आणि पूजिका : हरि: ॐ । ॐ । ॐ ।**

**अपवित्र: पवित्रो वा सर्वावस्थां गतोऽपि वा ।**
**य: स्मरेत् पुण्डरीकाक्षं स बाह्याभ्यन्तर: शुचि: ॥**

अध्वर्यू : व्यक्ती अपवित्र, पवित्र वा कोणत्याही अवस्थेत असो, परमेश्वर स्मरणाने ती अंतर्बाह्य शुद्ध होते.

**अध्वर्यू आणि पूजिका :**

**अपवित्र: पवित्रो वा सर्वावस्थां गतोऽपि वा ।**
**य: स्मरेत् पुण्डरीकाक्षं स बाह्याभ्यन्तर: शुचि: ॥**

अध्वर्यू : अशा रीतीने परमेश्वर स्मरण करून स्वत: विशुद्ध झाल्यावर पूजास्थानाच्या शुद्धीला प्रारंभ करूया.

अध्वर्यू आणि पूजिका :

**आगमनार्थं तु देवानां गमनार्थं तु रक्षसाम् ।**
**कुर्वे घण्टारवं तत्र देवताह्वानलक्षणम् ॥**
**अपक्रामन्तु भूतानि पिशाचा: सर्वतो दिशम् ।**
**सर्वेषामविरोधेन वटपूजा समारभे ॥**

अध्वर्यू : शुभ शक्तीचे प्रतीक असणाऱ्या देवांचे आगमन व्हावे आणि दुष्ट शक्तीचे प्रतीक असलेले राक्षस निघून जावेत यासाठी मी देवतांना आवाहन करणारा घंटानाद करते. या पूजास्थानापासून सर्व दुष्ट शक्ती निघून जावोत म्हणजे सर्वांच्या अनुकूलतेने आपण वटवृक्षाची पूजा करू.

अध्वर्यू आणि पूजिका :

**आगमनार्थं तु देवानां गमनार्थं तु रक्षसाम् ।**
**कुर्वे घण्टारवं तत्र देवताह्वानलक्षणम् ।**
**अपक्रामन्तु भूतानि पिशाचा: सर्वतो दिशम् ।**
**सर्वेषामविरोधेन वटपूजा समारभे ॥**

अध्वर्यू : आपण पूजास्थानाची शुद्धता केली. आता आपण आचमन करू या. (पहिल्या तीन नमनांचे वेळी आचमन करावे आणि चौथ्या वेळेला उदक सोडावे.)

अध्वर्यू आणि पूजिका :

**ॐ केशवाय नम: । ॐ नारायणाय नम: ।**
**ॐ माधवाय नम: । ॐ गोविंदाय नम: ।**

अध्वर्यू : आता मी संकल्प सांगते.

अध्वर्यू आणि पूजिका :

**इह पृथिव्यां, जम्बुद्वीपे, भरतवर्षे, ..... ग्रामे / नगरे, बौद्धावतारे, ..... नाम संवत्सरे, ज्येष्ठमासे, शुद्धपक्षे, पौर्णिमातिथौ, ..... वासरे, ..... नक्षत्रे अस्माकं सौभाग्यवृद्ध्यर्थं वटपूजाव्रतं वयं करिष्यामहे ।**

अध्वर्यू :

या पृथ्वीतलावर, जम्बुद्वीपात, भारतदेशात, ..... गावात / नगरात, ..... संवत्सरात, ज्येष्ठ महिन्यात, शुक्ल पक्षात, पौर्णिमा तिथीला, ..... वारी ..... नक्षत्रावर आम्ही आमच्या अखंड सौभाग्यासाठी वटपूजा करीत आहोत.

कोणत्याही शुभकार्यासाठी प्रथम श्री गणेशाची प्रार्थना करतात. आपणही श्री गणेशाचे स्मरण करू आणि पूजास्थानी निवास करण्यासाठी त्याची प्रार्थना करू.

अध्वर्यू आणि पूजिका :

**सर्वदा सर्वकार्येषु नास्ति तेषाममङ्गलम् ।**
**येषां हृदिस्थो भगवान् विघ्नेशो गणनायक: ।।**

अध्वर्यू : ज्यांच्या हृदयात विघ्नहर्त्या गजाननाची वसती आहे ते सर्व कार्यात नेहमी यशस्वी होतात. (सर्वांनी दोन मिनिटे डोळे मिटून शांत बसावे व गणपतीचे ध्यान करावे.)

अध्वर्यू आणि पूजिका :

**वटवृक्ष नमस्तुभ्यं, नमस्तुभ्यं पुन: पुन: ।**

अध्वर्यू : हे वटवृक्षा, तुला पुन्हा पुन्हा नमस्कार असो.

**अध्वर्यू आणि पूजिका :**

**वट सिञ्चामि ते मूलं सलिलैः अमृतोपमैः ।**
**सूत्रेण वेष्टये भक्त्या गन्धपुष्पाक्षतैः समम् ॥**

**अध्वर्यू :** हे वडा, मी तुझ्या मुळाशी अमृतासारखे गोड पाणी घालते आणि भक्तीने सूत्ररूपी वस्त्र तुला नेसवते. शिवाय गन्ध, फुले आणि अक्षताही तुला वाहते.

**अध्वर्यू आणि पूजिका :**

**वटवृक्षाय नमः। शुद्धोदकस्नानं समर्पयामः ।**

वटवृक्षाला नमस्कार असो. स्नानासाठी शुद्ध जल अर्पण करते.

**वटवृक्षाय नमः ।सूत्रमयं वस्त्रं समर्पयामः ।**

वटवृक्षाला नमस्कार असो. हे सूत्ररूपी वस्त्र अर्पण करते.

(वृक्षाला तीन प्रदक्षिणा घालत सूत गुंडाळावे व जागेवर बसावे.)

**वटवृक्षाय नमः । हरिद्राकुंकुमादिसौभाग्यद्रव्याणि समर्पयामः।**

वटवृक्षाला नमस्कार असो. हळदकुंकू इत्यादि सौभाग्यद्रव्ये अर्पण करते.

**वटवृक्षाय नमः। सुवासार्थे धूपं आघ्रापयामः।**

वटवृक्षाला नमस्कार असो. सुवासासाठी धूप लावते.

**वटवृक्षाय नमः। प्रकाशार्थे दीपं दर्शयामः।**

वटवृक्षाला नमस्कार असो. प्रकाशासाठी दिवा लावते.

**वटवृक्षाय नमः। नैवेद्यं समर्पयामः।**

वटवृक्षाला नमस्कार असो. नैवेद्य दाखवते.

**वटवृक्षाय नमः। प्रदक्षिणां समर्पयामः।**

वटवृक्षाला नमस्कार असो. प्रदक्षिणा घालते.

अध्वर्यू आणि पूजिका :

**वटमूले स्थितो ब्रह्मा वटमध्ये जनार्दनः ।**

**वटाग्रे तु शिवो देवः सावित्री वटसंश्रिता ।।**

अध्वर्यू : वडाचे मुळात ब्रह्मा, खोडात विष्णू तर शेंड्यात शिव वास करतो. अशा या वृक्षाखाली सावित्रीने आश्रय घेतला होता.

अध्वर्यू आणि पूजिका :

**शेषोपचारार्थे नमस्कारं कुर्मः ।**

अध्वर्यू : आमच्या पूजेत जर काही उणे राहिले असेल तर वटराजा, ते या नमस्काराने पुरते करून घे.

अध्वर्यू : आता पतिव्रता सावित्रीची प्रार्थना करू.

अध्वर्यू व पूजिका :

**सावित्रि ब्रह्मसावित्रि सर्वदा प्रियभाषिणि ।**

**तेन सत्येन मां पाहि दुःखसंसारसागरात् ।**

**अवियोगो यथा देव सावित्र्या सहितस्य ते ।**

**अवियोगो तथाऽस्माकं भूयाज्जन्मनि जन्मनि ।**

अध्वर्यू व पूजिका :

हे सावित्री, तू नेहमी मधुरभाषी होतीस. तुझ्या सत्यनिष्ठेने तू या दुःखमय संसारात आमचे रक्षण कर. हे सत्यवाना, तुझा जसा सावित्रीशी कधीही विरह झाला नाही तसा आमचे पतीशीही आमचा (जन्मोजन्मी) विरह न घडावा.

अध्वर्यू व पूजिका :

**नमस्कारं कुर्मः ।**

अध्वर्यू : हे सावित्री, तुला मनोभावे नमस्कार असो.

# आरती

आरती वडराजा । देशि जीवन दूजा ।
आज तुजसाठी । करिते मी ही पूजा ॥धृ.॥

श्रमीक कोणि येता । खालि थकोनी बसता ।
वरती तुझि छाया । त्यांच्या थकल्या चित्ता ॥१॥

भुकेल्या गाई-गुरा । घालसि तू हा चारा ।
जळणाचा हा भारा । आणिते हा मी घरा ॥२॥

एक घालि तुज पाणी । फांदी तोडेल कोणी ।
भेदभाव नाही मनी । लागो जीवन कारणी ॥३॥

थकलेले पंख । बघ होती निवान्त ।
कसली नाही भ्रान्त । मन होतसे शांत ॥४॥

काय सांगु तुझि कीर्ती । पसरली या जगती ।
हरखून माझि मती । गाते तुझ्याच गोष्टी ॥५॥

प्राणवायु देता झाला । सत्यवान जागा केला ।
वर दिला सावित्रीला । ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमेला ॥६॥

बसता खाली ध्यानी । केला विचार मनी ।
सिद्धार्थ झाला ज्ञानी । कीर्ती येतसे कानी ॥७॥

चला लावु आजि सारे । कल्पवृक्ष दारोदार ।
बांधुनिया एक पार । करू परोपकार ॥८॥

# वटसावित्रीची कहाणी

ऐका मैत्रिणींनो, सावित्रीची कहाणी. आटपाट नगर होत. नगराच नाव होत भद्र. भद्र देशाचा राजा अश्वपती. अश्वपतीची पत्नी मालती. मालती सुशील होती. कशाची उणीव नव्हती. सगळी प्रजा सुखी होती. गुण्या-गोविंदाने नांदत होती. दु:ख मात्र एकच होत. पोटी त्यांच्या संतान नव्हत. सगळं काही करून झाल. शेवटी राजाने वसिष्ठांचे पाय धरले. वसिष्ठांनी उपाय सांगितला. गायत्री मंत्राचा जप दिला. राजाने जप केला. त्याला कन्यारत्न झालं. नाव तिचं सावित्री ठेवलं. सावित्री मोठी होत गेली. अधिक सुंदर दिसू लागली. राजाला लग्नाची चिंता पडली. सगळीकडे दवंडी पिटली. योग्य वर मिळाला नाही. मग सावित्रीच बाहेर पडली.

सावित्री अनेक नगरांतून फिरली. श्रीमंत देशातून हिंडली. अनेक राजे-युवराजे पाहिले. तिला श्रीमंती नको होती. राजवैभव नको होतं. तिला हवे होते चारित्र्य व सद्गुण. त्यांच्याच शोधात ती होती. अशी फिरता-फिरता खूप लांबवर आली. गाव दूर पडलं होतं. डोंगरमाथे बोडके होते. सगळं कसं वैराण होतं. प्यायला जवळपास पाणी नव्हतं. एवढ्यात एक वस्ती दिसली. सावित्री तेथे जाऊन पोहोचली. पाणी मागू लागली. पाणी पिऊन तृप्त झाली. एवढ्यात एक युवक तिच्या नजरेस पडला. सावित्रीला पाहाताक्षणी आवडला. तो पराक्रमी व सतेज होता. सावित्रीने त्याची चौकशी केली. त्याचं नाव सत्यवान होतं. कुटुंब अजिबात धनवान नव्हतं. शेती-भाती काहीच नव्हतं. पण सावित्रीला वैभवाचं कौतुक नव्हतं. तिला उत्तम गुण हवे होते. सत्यवानाजवळ ते सगळे होते. तिला तो पसंत पडला.

तिने आई-वडिलांना कळविलं. आई-वडिलांनी माहिती काढली. त्यांना कळालं तो खूप गरीब आहे. सदाचार हीच श्रीमंती आहे. राहायला चांगलं घर नाही. शिवाय मोठी व्याधी आहे. सासू-सासरे अंध आहेत. आई-वडिलांनी नकार दिला. हा वर नको तुला. तुला कष्टात राहावं लागेल. हे का आम्हाला

शोभेल? नारद म्हणाले, त्याची व्याधी मोठी आहे. कितपत जगेल शंकाच आहे. सर्वांनी तिला विरोध केला पण सावित्रीचा विचार नाही बदलला. निर्णय तिचा पक्का झाला. सत्यवानच पती म्हणून वरला. सत्यवानासह जंगलात आली. पर्णकुटीत राहू लागली. सासू-सासऱ्यांची सेवा करू लागली. आनंदाने नांदू लागली. सत्यवान लाकडं तोडत असे. जळण फाटा आणत असे. जवळपास झाडी नव्हती. लोकांनी ती छाटली होती. जळणाची मोठी चिंता होती. दूरवर जावं लागे. सावित्रीला मोठे दु:ख वाटे. सत्यवान दमत असे. पण काही इलाज नसे. असेच दिवस सरत होते. उन्हाळ्याचे दिवस होते. वर ऊन तापत होतं. सत्यवानाचे सत्त्व पणास लागलं होतं. ऊन सहन होत नव्हतं. सावित्रीला काळजी पडली. तीही सत्यवानासह बाहेर पडली.

खूप दूरवर गेली. पण जवळ पास झाडी नाही दिसली. थोडी आणखी लांब गेली. इकडे-तिकडे पाहू लागली. लांबवर झाडी दिसली. तिथे जाऊन पोहोचली. पोटात त्या दिवशी अन्न नव्हते. जवळपास पाणी नव्हते. होता-होता दुपार झाली. ऊन्हं पुरती वर चढली. सत्यवानाला भोवळ आली. तो खाली पडला. ऊन्हामुळेच सगळा प्रताप घडला. जवळपास सावली नव्हती. कारण जवळ हरित वनेच नव्हती. लोकांनी माहिती दिली. जवळ एक वन आहे. सावित्री त्याला घेवून गेली. जवळ काही मात्रा नाही. आता ईश्वरच चिंता वाहील. त्याला वारा घालत होती. पाणी त्याला पाजत होती. अंगात थोडी धुगधुगी होती. जवळ काही अन्न नाही. तशीच ती बसली होती. जमेल ते उपाय करित होती. तीन दिवस अखंड श्रमत होती. कशाची तिला पर्वा नव्हती. यमराजाशी झुंज देत होती. चौथा दिवस उजाडला. शुद्ध व निरोगी हवेमुळे सत्यवान हलकेच जागा झाला. सावित्रीला आनंद झाला. तिनं मृत्यूचा पराभव केला. सर्व लोकही आनंदित झाले.

हे सर्व कसं घडलं? तुम्हीही ऐका. ऊतू नका, मातू नका. घेतला वसा टाकू नका. वृक्षराजाची कृपा झाली. सावित्री सौभाग्यमंडित झाली. तुम्हीही हे

व्रत घ्या. घरी एक रोप लावा. पुत्राप्रमाणे जीव लावा. अखंड त्याचा सांभाळ करा. हिरवी झाडं तोडू नका. हे पाप करू नका. आरोग्य तुमचं बिघडवू नका. वृक्षराजाला प्रसन्न करा. पोटच्या पोरासारखं वाढवा. दीर्घायुष्य प्राप्त करा. घर सुखासमाधानाने भरा. जसं सावित्रीचं संकट टळलं, तिच्या पतीला दीर्घायुष्य मिळालं तसं आपणा सर्वांना मिळो. सर्व आपदा टळो.

ही साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सफळ संपूर्ण

# वड

लिंब नावाचं झाड आहे. त्या नावाचं गाव सातारा जिल्ह्यात आहे. फणसगाव तिकडे रत्नागिरी जिल्ह्यात आहे. कुठे वडगाव (मावळ) आहे तर कुठे वडगाव (शेरी) आहे. पण तसं पाहिलं तर वड नाही असं गाव शोधावंच लागेल.

विस्तारत जातो, वेढा घालत जातो तो वड ! नर्मदा नदीच्या मुखाशी एक बेट आहे. बेटावर आहे एक वटवृक्ष ! नाव आहे कबीरवट ! त्या एका झाडाच्या छायेत सात हजार सैनिकांचा एकदा तळ पडल्याचा उल्लेख मिळतो !

अड्यार नावाचं गाव मद्रासपाशी आहे. तेथे असाच एक अवाढव्य वड उभा आहे. पाचशे वर्षांचं त्याचं वय आहे ! तीन हजार धर्मशास्त्रज्ञांची परिषद या वृद्ध वृक्षानं आपल्या छत्रछायेत पार पाडून दाखविली ! साहजिकच आहे, कारण चार हजार चौरस मीटर या वृक्षराजानं व्यापलेलं क्षेत्र आहे ! चहू दिशांनी पसरत जाणे हा तर वडाचा धर्मच आहे, पण गगनचुंबी होण्याचीही त्याची हौस असतेच ! तीस तीस मीटर उंची त्याने गाठलेली दिसते.

सावलीखाली गाई-गुरांची खिल्लारे रवंथ करत आहेत, पायतळी पारावर पांथस्थ निवांतपणे पसरले आहेत अन् अंगाखांद्यावर अगणित पक्षीगण वट वट करत विसावले आहेत असं दृश्य असतं ते वटवृक्षाचं !

द्विपाद, चतुष्पाद आणि द्विजगणासही आसरा देणारा हा वृक्षराज म्हणजे मोठा तपस्वीच नाही का? अशा परोपकारी झाडास पार बांधून परमार्थ अन स्वार्थ साधावा असं माणसांना वाटत असतं. धर्मात तर सांगून ठेवलं आहे की अशा वृक्षास पुत्र मानावे ! त्याला पाणी घालून वाढवावे, त्याची काळजी घ्यावी ! अगदी मुलाबाळासारखे प्रेम करावे त्यावर ! त्याची मुंज करावी अन् योग्यवेळी त्याचा लग्नविधीही करावा.

येवढ्या प्रचंड पुत्राला वधू तरी कुठली आणायची ? ती त्याच्यासारखीच सतत विस्तारत जाणारी, भूमीत पाय रोवून दृढमूल होत असतानाही दशदिशात पसरत राहणारी विस्तारवादी हवी. हरळी हीच ती हवी तशी नवरी ! म्हणून तिच्याशी नववर जो वडराजा त्याचं लग्न करायचं असतं.

वड हा फांदी फांदीनं सर्व दिशांना पसरतो, हरळीही सर्व दिशांना पसरते. काही अंतर गेले की फांदी आधाराला खाली एक पारंबी सोडते अन् पुढे जाते, हरळीही वीतभर वाढली की जमिनीत एक मूळ सोडून पुढे जातच राहते.

वड हा अजर असतो, हरळीसही म्हातारपण नसतं. वड सहसा मरणार नाही. तो जणू अमर वृक्ष आहे ! हरळी तोडलीत तरी जमिनीतील गाडलेली तिची मुळे अंकुरतात नि हरळीही अमर असल्याची साक्ष देत राहातात.

वडानं जमीन धरून ठेवण्याचं व्रत घेतलं आहे. हरळीनेही जमिनीला घट्ट धरून ठेवलेलं असतं. वडा-हरळीचं कार्य हे जमिनीला जपून ठेवणं हे असल्यानं त्याचं दांपत्य कसं शोभून दिसतं ! अशी ही महान दंपती गावागावात नित्य नांदायला हवी आहे, म्हणून तर आपण मानतो वड कधी तोडायचा नसतो, पिंपळ कधी पाडू नये, उंबर कधी उपटू नये ! बरोबरच आहे ! वर्षानुवर्ष ज्याला मोठा आकार घ्यायला आवश्यक असतात असा हा एकेक कल्पवृक्ष बघताबघता जमीनदोस्त करणं अगदी सोपं असलं तरी माणसाच्या हिताचं नसतं. उलट जीवसृष्टीच्या घाताचंच ते ठरतं. आजवर गावागावातील सारी वनं आपण सरपण करून संपवून टाकली आणि वनापाठोपाठ आपलं जीवनही धोक्यात आणलं आहे !

ज्या ज्या गावानं कुऱ्हाडबंदी केली अन चराईबंदी स्वीकारली त्या त्या गावांचं कल्याण होताना आपल्याला दिसतं आहे. राळेगण सिद्धीकडे पहा ! त्यांनी गाव कसा सुजलाम् सुफलाम् करून दाखवला ! केवळ पाच दहा इंच पावसावर गाव कसा फुलवता येतो त्याचं जितं जागतं उदाहरण त्यांनी सिद्ध करून दाखवलं आहे !

आता आपणही शहाणं होऊन कुऱ्हाड चालवायचं थांबवूया, वृक्ष तोडणं थांबवूया, वृक्षारोपणास प्रारंभ करूया. वड जगवूया, पिंपळाला पाणी घालूया, पिंपरीचं पालनपोषण करूया, उंबराला अभय देऊया, तुळशीची भक्ती करूया आणि रूईचं रोप राखूया.

ज्येष्ठी पौर्णिमा आली आहे. वटसावित्रीचं व्रत करूया. वडाचा महिमा गाऊया. सावित्री सारखी मृत्यूवरही मात करूया.

वटसावित्रीचचं व्रत कशाला ? हो ! वडाचं मोठेपण आधी समजावून घेऊया.

वडाचं झाड असतं लाख लाख मोलाचं !

हो खरोखरी, लक्षावधी रूपयांचा लाभ वडामुळं, अगदी एका वडामुळं आपल्याला होतो, तो कसा ?

नीट ऐका. कलकत्ता विद्यापीठातला डॉक्टर दास हा मोठा प्राध्यापक. त्यानं वडाचाच अभ्यास केला. कितीतरी वर्ष त्यानं खूप मोजदाद केली. बागेतल्या भल्यामोठ्या वडाचं वय ठरवलं, पन्नास ! पन्नास वर्षात त्यानं किती पानं, फळं गाळली असतील त्याचं गणितही मांडलं. त्यामुळे खताचे रूपाने शेतीचा किती लाभ होतो ते पाहिलं. अहो ! अडीच लाखांचं खत त्या एकट्या वडानं आपल्या पन्नास वर्षाच्या आयुष्यात शेतीला दिल्याचं दिसलं.

दवाखान्यात रोग्याच्या नाकातोंडात नळ्या घातलेल्या आपण पाहातो. त्यातून प्राणवायू पुरवण्यात येतो. भारी पैशाचं काम असतं ते ! पण आपल्याला

फुकटात प्राणवायू देणाऱ्या झाडाचं-वडाचं आपल्याला कुठे ज्ञान आहे ? वडापिंपळाची झाडं तर खूपच प्राणवायू देतात. त्या डॉक्टर दासांनी त्याचाही हिशोब केला आणि ते म्हणतात की पन्नास वर्षात एका वटवृक्षानं दिलेल्या प्राणवायूचं मोल भरतं अडीच लक्ष रुपये !

आपण प्राणवायू घेऊन नाकावाटे बाहेर टाकतो तो खराब झालेला वायू ! तो आसपासची हवा खराब करणारा प्राणिमात्रांनी सोडलेला वायू ही झाडं खातात अन् वाढत राहतात ! वातावरणाच्या स्वच्छतेचं हे केवढं काम वडासारखी झाडं करत असतात त्याचंतर आपल्याला भानच नसतं ! जिथं झाडं नाहीत आणि गाड्यामोटारीतून असाच खराब वायू सारखा बाहेर पडत राहतो तेथे तो माणसांच्या नाकावाटे त्याच्या छातीत जाऊनं कर्करोगासारखे रोग होत आहेत आणि म्हणून काही माणसं नाकाला गाळणी लावून फिरताना दिसत आहेत. खेडेगावांत गिरण्या नाहीत, गाड्या नाहीत त्यामुळे येथे बरे आहे. हवा ताजी आहे. शुद्ध आहे. पण ध्यानात ठेवा घराघरातून चुलींचा धूर येतो. प्राणिमात्रांनी वापरलेला खराब वायू त्यात मिसळतो. तरीही आपल्या येथली हवा ताजी राहते ती या वडासारख्या थोर वृक्षांमुळे ! वडाच्या या कामाचं मोल किती ? डॉक्टर दास यांच्या गणितानुसार पन्नास वर्षात पाच लाख रुपयांचं हवा शुद्धीचं काम एक वडच करू शकतो !

एका वटवृक्षाचे आपल्यावरील उपकार केवढे ! पन्नास वर्षात प्राणवायू, खत आणि हवेचे शुद्धीकरणाद्वारा त्यानं केलेल्या सेवेचं मोल झालं दशलक्ष रुपये! १० लाख !

आकाशातून धावणाऱ्या ढगांमधील पाणी खेचून घेण्याचं कामही हे वृक्ष करत असतात. त्यायोगे पाऊस येतो याची किंमत किती ? फांद्या, पारंब्यांतून मिळणाऱ्या लाकूडफाट्याची किंमतही थोडी नाही. धूप थांबवून मातीचं रक्षण करण्याचं मोल काय ? उन्हाळ्यात हवेत आर्द्रता सोडून गारवा आणण्याच्या त्याच्या कर्तबगारीची किंमत ? असं सारं काम जमेस धरलं तर एक वडाचं झाड

पन्नास वर्षात आपली पंधरा लाख रुपयांची सेवा करतं ! असा लाख मोलाचा वृक्ष तोडायचा म्हणजे महापातक नव्हे का?

मैत्रिणींनो, वडाकडं पहावं ते वैद्य म्हणून ! त्याची कोवळी पानं, खडीसाखर आणि पळसाचा डिंक, वेलदोडा नि वंशलोचनासह गाईच्या दुधातून घ्याल तर धूपणीचा त्रास जाईल ! मूळव्याध असो की इसब ! पिकलेली पानं जाळून, ती राख तेलातून लावल्यास गुण हमखास ! पक्ष्यांना आवडणारी याची लालबुंद फळं आपणही खाल्ली तर कफापित्ताचा निकाल ठरलेला ! पारंब्यांचे अंकुर वाटून पोटात घेतले की जंताचा निकाल ! जखमेवर चोळताना, दातदुखीवरही चीक चालतो.

आणखी एक वडाचा गुण ! त्याच्या पारंब्यांचे कोवळे कोवळे अंकुर वाटून तुपात खाल्ल्याने वंशाला अंकुर फुटतो असंही म्हणतात !


गावागावातला हा फुकटचा वैद्य ! त्याला जवळपासच, घरासमोर अंतरावर जागा द्यावी. छान पार बांधावा, याचा वारा घ्यावा, याच्या छायेत बसावं, पोरांनी याच्या अंगाखांद्यावर सूरपारंब्या खेळाव्यात, गुरावासरांनी याच्या गारव्याला बसावं !

हा यज्ञीय वृक्ष आहे. लग्न लावताना होमात याच्या काड्या अग्निदेवतेला अर्पण करायच्या असतात. त्यांना समिधा म्हणतात.

असं किती सांगावं वटमहात्म्य !

याची गरज कधी न सरो नि हा वैद्य कधी न मरो !

## ज्ञान प्रबोधिनी- एक चैतन्य स्फुरण



१९६२ मध्ये स्वर्गवासी वाच. वि.वि. तथा आप्पाजी पेंडसे या ध्येयवेड्या द्रष्ट्याने पाहिलेले नवनिर्माणाचे स्वप्न प्रबोधिनीच्या रूपाने आकाराला आले. खूप नवीन कल्पना आणि परिश्रम यांचे सिंचन प्रबोधिनीचे संस्थापक संचालक कै.वाच वि. वि. पेंडसे यांनी प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांच्या आणि विद्यार्थी विद्यार्थिनींच्या मनोभूमीवर केले आहे. त्यातील काही कल्पना बीजरूपात आहेत, काही धुमारू लागल्या आहेत. शिक्षण, संशोधन, ग्रामविकसन, आरोग्य, उद्योग, संघटन अशा बहुविध दिशांनी प्रबोधिनीचे कार्य विस्तारलेले आहे. परंतु प्रबोधिनीच्या घटनेत सांगितलेली प्रबोधिनीची उद्दिष्टे दृष्टीपुढे आणली, तर झालेले काम बिंदूएवढे आहे, राहिलेले काम सिंधूएवढे आहे.

नेतृत्व-विकास, शिक्षणप्रणालीची निर्मिती, इत्यादींवर ग्रथित केलेल्या उद्देशांच्या मुळाशी स्वदेशात विचार-प्रबोधन व कार्य-प्रबोधन व्हावे, देशाचा कायापालट व्हावा, लोकमानसात नवचैतन्य निर्माण व्हावे असा हेतू आहे.

प्रबोधिनीचे प्रयत्न चालले आहेत ते या दिशेने. आपणा सर्वांचा स्नेह, सहकार्य आणि सोबत या वाटेवर असावी, अशी अगत्याची विनंती.

ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे ३०

ज्ञान प्रबो[illegible]ालेत
प्रकाशित झालेल्या[illegible]

०१ वर्षारंभ उपासना(श्रावणी) रु. ५
०२ वर्षान्त उपासना रु. ८
०३ दैनंदिन उपासना (संध्या) रु. ८
०४ विद्याव्रत उपासना रु. १०
०५ विवाह प्रयोग रु. १५
०६ नामकरण उपासना रु. ५
०७ साठी शांति उपासना रु. ८
०८ सहस्रचंद्रदर्शन शांति रु. ८
०९ वास्तुशांति उपासना रु. ८
१० गणेश स्थापना रु. ६
११ अन्त्येष्टि व
एकोद्दिष्ट श्राद्ध रु. १५
१२ देहदान रु. ६
१३ सांवत्सरिक श्राद्ध रु. ५
१४ हरितालिका पूजा रु. ८
१५ श्रीसत्यनारायण पूजा रु. १०
१६ हिंदूकरण विधि रु.१२

अन्य प्रकाशने

०१ ज्ञान प्रबोधिनी : एक अभिनव शैक्षणिक प्रयोग : खंड ३ (मराठी) रु. ८० /-
इंग्रजी ( **A New Experiment in Education, Vol.2) Rs. 75/-**
०२ एक अदम्य उत्कट चैतन्य - आद्य संचालक डॉ. वि. वि. पेंडसे यांचे चरित्र -
डॉ. स्वर्णलता भिशीकर रु. ५०/-
०३ राष्ट्रद्रष्टे विवेकानंद - डॉ. वि.वि. पेंडसे रु.३५/-
०४ विवेकानंदांचा राष्ट्रधर्म -डॉ. वि.वि. पेंडसे.- रु. ३०/-
०५ श्री माताजी - श्री अरविंद काय म्हणाले ? - डॉ. वि. वि. पेंडसे रु. ३५/-
०६ उपासनेद्धारा व्याधिमुक्ती - डॉ. वि.वि. पेंडसे रु.. २०/-
०७ संस्कृत साहित्याचा इतिहास- भाग १ व २ - डॉ. सुरुचि पांडे -प्रत्येकी रु. ६०/-
०८ चक्रव्यूह -डॉ. गिरीश आफळे रु. ८०/-
०९ तुमच्याही लक्षात राहील -वा. कृ कोठुरकर रु. १२५/-
(आठवण - साठवण)
१० प्राचीन भारतीय द्यूत - डॉ. म.अ.मेहेंदळे रु. २५/-
११ सुभाषितमाला - अनुवादक-श्री. द.मो. पेठे- रु. ३०/-
१२ गरुड पुराणोक्त आयुर्विज्ञान - प्रा. शुभांगी देवरे - रु. २५०/-

संस्कृत प्राकृत ग्रंथ

०१ वास्तुसारप्रकरणम् : ठक्कुर फेरु, संपादन : र.पु. कुलकर्णी - रु. ७५/-
०२ त्रिशङ्कु: - श्री. दि. द. बहुलीकर रु. ६०/- ( इंग्रजी अनुवादासहित)
०३ कल्लोलिनी -श्री. दि. द. बहुलीकर रु. ३०/- (इंग्रजी अनुवादासहित)
०४ **Engr. Geometry of Yajna-Kundas & Yajna Mandapas**
**Dr. R..P.Kulkarni -Rs. 75/-**

मुद्रक : ज्ञान प्रबोधिनी मुद्रण विभाग, पुणे ☎ ४४७७६९१